# प्रकरण चौथे

## कोल्हापूर शहरातील वडार समाजातील श्रमजीवी कामगारांची सामाजिक, आर्थिक पार्श्वभूमी

# प्रकरण - चौथे

# कोल्हापूर शहरातील वडार समाजातील श्रमजीवी कामगारांची सामाजिक, आर्थिक पार्श्वभूमी

## प्रस्तावना :

प्रस्तुत प्रकरणात वडार समाजातील श्रमजीवी कामगारांचा सामाजिक-आर्थिक अभ्यास करण्यासाठी संकलित केली. निवडलेल्या नमुन्यांतील १00 उत्तरदात्यांकडून मुलाखत अनुसूचीच्या सहाय्याने संकलित केलेल्या माहितीच्या आधारे वडार समाजाची व्यक्तीगत सामाजिक आणि आर्थिक पार्श्वभूमीचे वर्णन आणि विश्लेषण केले आहे.

वडार समाजाची व्यक्तिगत सामाजिक, आर्थिक पार्श्वभूमी समजून घेण्यासाठी वय, लिंग, पोटजमात, शैक्षणिक दर्जा, व्यवसाय, कुटुंबातील एकूण साक्षर-निरक्षर व्यक्ती, कुटुंबाचा व्यवसाय, मातृभाषा, कुटुंबाचा प्रकार, कुटुंबातील एकूण सदस्य संख्या, घरचा प्रकार, कर्जासंबंधी, वार्षिक उत्पन्न, स्थलांतर इ. परिवर्त्या संबंधीच्या माहितीचे वर्गीकरण आणि विश्लेषण खाली दिले आहे.

## ४. १ वय (Age):

उत्तरदात्यांचे वयानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक ४.१ मध्ये दर्शविण्यात आले आहे.

सारणी क्रमांक. ४.१

उत्तरदात्यांच्या वयानुसार केलेले वर्गीकरण

| वय प्रवर्ग | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| २0 ते ३0 वर्षे | २३ | २३.0 |
| ३१ ते ४५ वर्षे | २७ | २७.0 |
| ४६ ते ५५ वर्षे | ३४ | ३४.0 |
| ५५ पेक्षा अधिक | १६ | १६.0 |
| **एकूण** | **१00** | **१00.0** |

सारणी क्रमांक. ४.१ मधील माहितीवरून असे दिसून येते की, बहुतांशी (३४.0%) प्रौढ वयोगटामधील उत्तरदात्यांचे प्रनाण सर्वात अधिक दिसून येते. त्याखालोखाल ३१ ते ४५ या मध्यमवयीन वयोगटातील उत्तरदात्यांचे प्रमाण (२७.0%), उर्वरित अनुक्रमे २0 ते ३0 या तरूण वयोगटातील उत्तरदात्यांचे प्रमाण (२३.0%) उत्तरदात्यांमध्ये वृद्ध वयोगटातील (५६ ते अधिक) उत्तरदात्यांचे प्रमाण (१६.0%) सर्वात कमी असल्याचे दिसून येते.

वरील सारणीवरून असा निष्कर्ष काढता येईल की, एकूण १00 उत्तरदात्यांमध्ये तरूण, मध्यवयीन आणि वृद्ध उत्तरदात्यांच्या तुलनेत प्रौढ वयोगटातील उत्तरदात्यांचे प्रमाण (३४.0%) हे सर्वाधिक असल्याचे दिसून येते.

## ४.२ लिंग (Sex) :

उत्तरदात्यांचे लिंगानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक ४.२ मध्ये दर्शविण्यात आले आहे.

**सारणी क्रमांक. ४.२**

**उत्तरदात्यांचे लिंगानुसार केलेले वर्गीकरण**

| लिंग | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| पुरूष | ३१ | ३१.0 |
| स्त्री | ६९ | ६९.0 |
| **एकूण** | **१00** | **१00.0** |

सारणी क्रमांक. ४.२ मधील माहितीवरून असे दिसून येते की, उत्तरदात्यांमध्ये बहुतांशी (६९.0%) उत्तरदाते पुरूष असल्याचे दिसून येतात. तर उर्वरित (३१.0%) उत्तरदाते स्त्रिया असल्याचे निदर्शनास येतात.

एकूण १00 उत्तरदात्यांमध्ये पुरूषांचे प्रमाण (६९.0%) स्त्रियांपेक्षा अधिक असल्याचे दिसून येते.

## ४.३ पोटजमात (Sub Caste):

वडार समाज वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या नावांनी ओळखला जातो. या वेगवेगळ्या नावांबरोबरच त्यांच्या व्यवसायानुसार त्यांच्यात पोटजाती पाहावयास मिळतात. त्यानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक. ४.३ मध्ये दर्शविण्यात आले आहे.

**सारणी क्रमांक. ४.३**

**उत्तरदात्यांचे पोटजातीनुसार केलेले वर्गीकरण**

| पोटजात | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| मातीवडार | २६ | २६.0 |
| गाडीवडार | ३९ | ३९.0 |
| जातीवडार (पाथरवट) | ३५ | ३५.0 |
| **एकूण** | **१00** | **१00.0** |

सारणी क्रमांक. ४.३ मधील संकलित केलेल्या माहितीवरून असे दिसून येते की, एकूण उत्तरदात्यांमध्ये बहुतांशी गाडीवडार या पोटजातीचे प्रमाण (३९.0%) सर्वात अधिक असल्याचे दिसून येते. त्याखालोखाल (३५.0%) उत्तरदाते जातीवडार या पोटजातीतील असल्याचे दिसून येते. तर उर्वरित (२६.0%) उत्तरदाते मातीवडार या पोटजातीतील असल्याचे आढळून येते.

एकूण १00 उत्तरदात्यांमध्ये मातीवडार व जातीवडार यांच्या तुलनेत गाडीवडार (३९.0%) या उत्तरदात्यांचे प्रमाण अधिक दिसून येते.

## ४.४ उत्तरदात्यांची शैक्षणिक स्थिती (Education):

शिक्षणाचा समाजशास्त्रीयदृष्ट्या विचार करता असे दिसून येते की, शिक्षण ही एक सामाजिक संस्था आहे. या शिक्षण संस्थेमार्फत व्यक्तीचे सामाजिकरण आणि सामाजिक नियंत्रण प्रस्थापित करण्याचे कार्य, तसेच विविध आर्थिक भूमिकांसाठी तयार करणे या गोष्टी घडत असतात. त्यामुळे उत्तरदात्यांची शैक्षणिक स्थिती पाहणे गरजेचे ठरते. यानुसार केलेले

वर्गीकरण सारणी क्रमांक.४.४ मध्ये दर्शविण्यात आले आहे.

**सारणी क्रमांक. ४.४**

**उत्तरदात्यांच्या शैक्षणिक स्थितीनुसार केलेले वर्गीकरण**

| शैक्षणिक दर्जा | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| निरक्षर | ४४ | ४४.0 |
| प्राथमिक | १५ | १५.0 |
| माध्यमिक | ३१ | ३१.0 |
| उच्च-माध्यमिक | ३ | ३.0 |
| पदवीधर | ४ | ४.0 |
| पदव्युत्तर | २ | २.0 |
| इतर कोर्स | १ | १.0 |
| **एकूण** | **१00** | **१00.0** |

सारणी क्रमांक. ४.४ मधील दिलेल्या माहितीवरून असे दिसून येते की, जवळजवळ निम्मे (४४.0%) उत्तरदाते निरक्षर असल्याचे दिसून येतात. तर उर्वरित सर्व साक्षर आहेत. साक्षर उत्तरदात्यांपैकी बहुसंख्य (३१.0%) उत्तरदात्यांनी माध्यमिक शिक्षण घेतलेले दिसून येते. त्याखालोखाल (१५.0%) उत्तरदात्यांनी प्राथमिक शिक्षण, तर उर्वरित अनुक्रमे (४.0%) उत्तरदात्यांनी पदवीधर, (३.0%) उत्तरदात्यांनी उच्च माध्यमिक, (२.0%) उत्तरदात्यांनी पदव्युत्तर शिक्षण घेतल्याचे निदर्शनास येते. तर केवळ १ उत्तरदात्यांने इतर कोर्स (हॉटेल मॅनेजमेण्ट) शिक्षणाचा मार्ग स्विकारल्याचा दिसून येतो.

वरील आकडेवारी असे सूचित करते की, वडार समाजामध्ये अशिक्षित व अल्पशिक्षित यांचे प्रमाण जास्त दिसून येते.

### ४.५ उत्तरदात्यांचा प्रमुख व्यवसाय (Main Occupation) :

उत्तरदात्यांच्या प्रमुख व्यवसायानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक.४.५ मध्ये दर्शविले आहे.

**सारणी क्रमांक. ४.५**

**उत्तरदात्यांचा प्रमुख व्यवसायानुसार केलेले वर्गीकरण**

| उत्तरदात्यांचा प्रमुख व्यवसाय | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| खणीमध्ये दगड फोडणे | १४ | १४.0 |
| स्वत: खाणमालक | ३ | ३.0 |
| खुदाई काम | ४ | ४.0 |
| जाती, पाटा, वरवंटा घडविणे | १८ | १८.0 |
| गवंडी काम | ११ | ११.0 |
| मजूरी काम | ४ | ४.0 |
| ठेकेदार | ५ | ५.0 |
| नोकरी | ११ | ११.0 |
| उद्योगधंदा | १ | १.0 |
| व्यापार (किराणा माल दुकान) | ५ | ५.0 |
| धुणी-भांडी (स्त्रिया) | १४ | १४.0 |
| इतर | १0 | १0.0 |
| **एकूण** | **१00** | **१00.0** |

प्रस्तुत अभ्यासासाठी निवडलेल्या एकूण १00 नमुन्यापैकी बहुसंख्य (५९.0%) उत्तरदाते पारंपरिक व्यवसाय (जातीशी संबंधित) काम करताना आढळतात. उर्वरित (४१.0%) उत्तरदात्यांनी नविन / (आधुनिक) प्रकारच्या व्यवसायाचा स्विकार केलेला दिसून येतो. या नविन/ (आधुनिक) व्यवसायामध्ये नोकरी, किराणामाल दुकान, उद्योगधंदा, कारखान्यातील काम, टेलरकाम, रिक्षाचालक, ड्रायव्हर, विमा एजंट, आचाऱ्याच्या हाताखाली, धुणी-भांडी (स्त्रिया) इ. बाबींचा समावेश होतो.

## ४.६ उत्तरदात्यांच्या कुटुंबातील स्त्री-पुरूषांचे प्रमाण

उत्तरदात्यांच्या कुटुंबातील स्त्री-पुरूषांचे केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक. ४.६ मध्ये दर्शविण्यात आले आहे.

**सारणी क्रमांक. ४.६**

**उत्तरदात्यांच्या कुटुंबातील स्त्री-पुरूषांचे प्रमाण दर्शविणारा तक्ता**

| उत्तरदात्यांच्या कुटुंबातील पुरूषांचे प्रमाण | कुटुंब संख्या | उत्तरदात्यांच्या कुटुंबातील स्त्रियांचे प्रमाण | कुटुंब संख्या |
|---|---|---|---|
| **00** | १ | १-३ | ८३ |
| १-३ | ७३ | ४-६ | १७ |
| ४-७ | २६ | **एकूण** | **१00** |
| **एकूण** | **१00** | | |

सारणी क्रमांक.४.६ मधील दिलेल्या आकडेवारीवरून असे दिसून येते की, बहुतांशी (८३.0%) उत्तरदात्यांच्या कुटुंबामध्ये पुरूषांचे प्रमाण १ ते ३ असल्याचे दिसून येते. तर बहुतांशी (३.0%) कुटुंबामध्ये स्त्रीयांचे प्रमाण १ ते ३ असल्याचे आढळून आले.

## ४.७ उत्तरदात्यांच्या कुटुंबातील एकूण सदस्य

उत्तरदात्यांच्या कुटुंबातील एकूण सदस्यांनुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक.४.७ मध्ये दर्शविण्यात आले आहे.

**सारणी क्रमांक. ४.७**

**उत्तरदात्यांच्या कुटुंबातील एकूण सदस्यांनुसार केलेले वर्गीकरण**

| उत्तरदात्यांच्या कुटुंबातील एकूण सदस्यांचे प्रमाण | कुटुंब संख्या |
|---|---|
| २-५ | ५४ |
| ६-१२ | ४६ |
| **एकूण** | **१00** |

सारणी क्रमांक.४.७ मधील दिलेल्या आकडेवारीवरून बहुसंख्य ५४ उत्तरदात्यांच्या कुटुंबामध्ये एकूण सदस्यांचे प्रमाण २ ते ५ असल्याचे दिसून येते. तर ४६ कुटुंबामध्ये ६ ते १२ एकूण सदस्यांचे प्रमाण दिसून येते.

## ४.८ उत्तरदात्यांच्या कुटुंबातील वयानुसार केलेले वर्गीकरण

उत्तरदात्यांच्या कुटुंबातील वयानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक. ४.८ मध्ये दर्शविण्यात आले आहे.

**सारणी क्रमांक.४.८**

**उत्तरदात्यांच्या कुटुंबातील वयानुसार केलेले वर्गीकरण**

| १० वर्षा पर्यंत सदस्य | कुटुंबाची संख्या | ११ ते २० वर्षा पर्यंतचे सदस्य | कुटुंबाची संख्या | २१ ते ४० वर्षा पर्यंतचे सदस्य | कुटुंबाची संख्या | ४१ ते ६० वर्षा पर्यंतचे सदस्य | कुटुंबाची संख्या | ६१ च्या पुढे | कुटुंबाची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 00 | ३८ | 00 | ५७ | 00 | २ | 00 | १२ | 00 | ७६ |
| १-३ | ६१ | १-३ | ४३ | १-३ | ८३ | १-२ | ८७ | १-२ | २४ |
| ५ | १ | एकूण | १00 | ६-८ | १५ | ४ | १ | एकूण | १00 |
| एकूण | १00 | | | एकूण | १00 | एकूण | १00 | | |

सारणी क्रमांक. ४.८ मधील दिलेल्या आकडेवारीवरून बहुसंख्य ६१ उत्तरदात्यांच्या कुटुंबामध्ये १0 वर्षापर्यंतच्या सदस्यांचे प्रमाण १ ते ३ असल्याचे दिसून येते. तसेच ११ ते २0 या वयोगटामधील बहुसंख्य (५७.0%) उत्तरदात्यांच्या कुटुंबामध्ये कोणीहो सदस्य नाही. २१ ते ४0 वयोगटामधील ८३ कुटुंबामध्ये १ ते ३ सदस्य, ४१ ते ६0 या वयोगटामधील ८७ कुटुंबामध्ये १ ते २ सदस्य आढळून आले. तर ६१ च्या पुढे या वयोगटामधील ७६ कुटुंबामध्ये कोणीही सदस्य आढळत नाहीत.

### ४.९ उत्तरदात्यांच्या कुटुंबियांचा शैक्षणिक दर्जा :

उत्तरदात्यांबरोबरच उत्तरदात्यांच्या कुटुंबातील सदस्यांचा शैक्षणिक दर्जा समजावून घेण्यासाठी माहिती संकलित केली होती. उत्तरदात्यांचे शिक्षणाचे प्रमाण कमी असले तरी दुसऱ्या पिढीमध्ये मात्र शिक्षणप्रसार झालेला दिसून येतो. परंतु शैक्षणिक प्रगती उल्लेखनीय नाही. सारणी क्रमांक.४.९ वडार समाजातील शैक्षणिक प्रगतीचे विश्लेषण करते.

**सारणी क्रमांक. ४.९**

**उत्तरदात्यांच्या कुटुंबियांचा शैक्षणिक दर्जा दर्शविणारा तक्ता**

| अशिक्षित (सदस्य संख्या) | कुटुंब संख्या | प्राथमिक (सदस्य संख्या) | कुटुंब संख्या | माध्यमिक (सदस्य संख्या) | कुटुंब संख्या | उच्च माध्य मिक (सदस्य संख्या) | कुटुंब संख्या | पदवीदर (सदस्य संख्या) | कुटुंब संख्या | पदव्युत्तर (सदस्य संख्या) | कुटुंब संख्या | इतर कोर्स | कटुंब सख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 00 | १५ | 00 | ३४ | 00 | २० | 00 | ७२ | 00 | ८८ | 00 | ९७ | 00 | ९५ |
| १-३ | ७६ | १-३ | ५७ | १-३ | ७६ | १-३ | २८ | १-३ | १२ | १ | ३ | १ | ५ |
| ४-६ | 0९ | ४-५ | 0९ | ४-५ | ४ | एकूण | १00 | एकूण | १00 | एकूण | १00 | एकूण | १00 |
| एकूण | १00 | एकूण | १00 | एकूण | १00 | | | | | | | | |

सारणी क्रमांक. ४.९ मधील दिलेल्या आकडेवारीवरून असे दिसून येते की, उत्तरदात्यांच्या कुटुंबातील अशिक्षितांचे प्रमाण बहुतांश (७६.0%) कुटुंबामध्ये १ ते ३ सदस्य असे आहे. उत्तरदात्यांच्या कुटुंबातील प्राथमिक शिक्षणाचे प्रमाण बहुतांश कुटुंबामध्ये (५७.0%) १ ते ३ सदस्य, उत्तरदात्यांच्या कुटुंबामध्ये माध्यमिक शिक्षणाचे प्रमाण बहुतांश कुटुंबामध्ये (७६.0%) १ ते ३ सदस्य, उच्च माध्यमिक शिक्षणाचे प्रमाण (२८.0%) कुटुंबामध्ये १ ते ३ सदस्य, १२ कुटुंबामध्ये १ ते ३ पदवीधर सदस्य आढळले, तर ३ कुटुंबामध्ये १ पदव्युत्तर सदस्य आढळून येते. व ५ कुटुंबामध्ये इतर कोर्स घेतलेले सदस्य दिसून येतात.

वरील सारणीवरून असा निष्कर्ष काढता येईल की, दुसऱ्या पिढीमध्ये शिक्षण प्रसार झाला असला तरी शैक्षणिक प्रगती उल्लेखनीय नाही. वडार समाज आता कुठे स्थिरावला

असला तरी पोटाची खळगी भरण्यासाठी कामाच्या शोधात त्याला गावो-गाव फिरावे लागते या भटकंतीमध्ये कुटुंबामधील प्रमुख लोकांचा समावेश असतो. त्यामुळे कुटुंबातील इतर सदस्यांकडे आपल्या पाल्याकडे वडार समाजातील व्यक्तीचे दुर्लक्ष होत असलेले दिसते. परिणामी शाळेतील गळतीचे प्रमाण, शिक्षणाकडे दुर्लक्ष अशी अवस्था वडार समाजातील कुटुंबामध्ये दिसून येते.

## ४. १० उत्तरदात्यांच्या कुटुंबाचा वैवाहिक दर्जा

उत्तरदात्यांबरोबरच उत्तरदात्यांच्या कुटुंबातील सदस्यांचा वैवाहिक दर्जा समजावून घेण्यासाठी माहिती संकलित केली होती. उत्तरदात्यांच्या कुटुंबियांचा वैवाहिक दर्जानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक ४.१० मध्ये दर्शविण्यात आले आहे.

**सारणी क्रमांक. ४. १०**

**उत्तरदात्यांच्या कुटुंबियांचा वैवाहिक दर्जा दर्शविणारा तक्ता**

| अविवाहित सदस्य संख्या | कुटुंब संख्या | विवाहित सदस्य संख्या | कुटुंब संख्या | विधवा सदस्य संख्या | कुटुंब संख्या | विधूर सदस्य संख्या | कुटुंब संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 00 | १८ | 00 | १३ | 00 | ७७ | 00 | ८३ |
| १-३ | ७३ | १-२ | ५0 | १ | २३ | १-३ | १७ |
| ४-५ | ९ | ४-१0 | ३७ | एकूण | १00 | एकूण | १00 |
| एकूण | १00 | एकूण | १00 | | | | |

सारणी क्रमांक. ४.१० मधील दिलेल्या आकडेवारीवरून असे दिसून येते की, उत्तरदात्यांच्या कुटुंबामधील अविवाहित सदस्यांचे प्रमाण बहुतांश (७३.0%) कुटुंबामध्ये १ ते ३ सदस्य, विवाहित सदस्यांचे प्रमाण (५0.0%) कुटुंबामध्ये १ ते २ सदस्य असल्याचे दिसून येते. उत्तरदात्यांच्या कुटुंबातील विधवा (स्त्री) सदस्यांचे प्रमाण ७७ कुटुंबामध्ये नसल्याचे दिसून येते. विधूर (पुरूष) सदस्यांचे प्रमाण ८३ कुटुंबामध्ये कोणीही आढळत नाही.

वरील सारणीवरून असा निष्कर्ष काढता येईल की अविवाहित सदस्यांपेक्षा विवाहित सदस्यांची संख्या अधिक प्रमाणात दिसून येते. तसेच विधूर सदस्यांपैकी विधवा स्त्री संख्या अधिक प्रमाणात दिसून येते.

## ४.११ कुटुंबातील सदस्यांची व्यवसायविषयक माहिती

उत्तरदात्यांबरोबर उत्तरदात्यांच्या कुटुंबातील व्यवसायात गुंतलेल्या व्यक्तींची माहिती संकलित केली होती. कुटुंबातील सदस्यांची व्यवसायविषयक माहिती सारणी क्रमांक. ४.११ मध्ये दर्शविण्यात आले आहे.

## सारणी क्रमांक. ४. ११

## उत्तरदात्यांच्या कुटुंबातील सदस्यांची व्यवसायविषयक माहिती दर्शविणारा तक्ता

| खणीमध्ये दगड फोडणे (सदस्य संख्या) | कुटुंब संख्या | खुदाई काम (सदस्य संख्या) | कुटुंब संख्या | जाते, पाटे, वरवंटा घडविणे (सदस्य संख्या) | कुटुंब संख्या | गवंडी काम (सदस्य संख्या) | कुटुंब संख्या | मजूरी काम (सदस्य संख्या) | कुटुंब संख्या | ठेकेदार (सदस्य संख्या) | कुटुंब संख्या | कारखान्यातील कामगार (सदस्य संख्या) | कुटुंब संख्या | खाजगी नोकरी (सदस्य संख्या) | कुटुंब संख्या | किराणा माल दुकान (सदस्य संख्या) | कुटुंब संख्या | शासकीय नोकरी (सदस्य संख्या) | कुटुंब संख्या | उद्योग धंदा (सदस्य संख्या) | कुटुंब संख्या | धुणी भांडी (स्त्रिया) (सदस्य संख्या) | कुटुंब संख्या | गृहिणी (सदस्य संख्या) | कुटुंब संख्या | इतर व्यवसाय (सदस्य संख्या) | कुटुंब संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 00 | ८३ | 00 | ९0 | 00 | ८२ | 00 | ७५ | 00 | ७९ | 00 | ९३ | 00 | ८६ | 00 | ९१ | 00 | ९४ | 00 | ८९ | 00 | ९९ | 00 | ७३ | 00 | ४५ | 00 | ७४ |
| १-३ | १७ | १-३ | १0 | १-३ | ५ | १-३ | २३ | १-३ | २१ | १-२ | ७ | १-२ | १४ | १-२ | ९ | १-२ | ६ | १-२ | ११ | २ | १ | १-२ | २७ | १-३ | ५३ | १-२ | २५ |
| एकूण | १00 | एकूण | १00 | ४-८ | १३ | ४-५ | २ | एकूण | १00 | एकूण | १00 | एकूण | १00 | एकूण | १00 | एकूण | १00 | एकूण | १00 | एकूण | १00 | एकूण | १00 | ४-५ | २ | ५ | १ |
| | | | | एकूण | १00 | एकूण | १00 | | | | | | | | | | | | | | | | | एकूण | १00 | एकूण | १00 |

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

सारणी क्रमांक ४.११ मध्ये दिलेल्या आकडेवारीवरून असे दिसून येते की, व्यवसायामध्ये गुंतलेल्या सदस्यांपैकी उत्तरदात्यांच्या १७.0 टक्के कुटुंबामध्ये १ ते ३ सदस्य खणीमध्ये दगड फोडणारे सदस्य आढळून आले. १0.0 टक्के कुटुंबामध्ये १ ते ३ सदस्य खुदाई काम करणारे, ५.0 टक्के कुटुंबामध्ये १ ते ३ सदस्य व १३.0 टक्के कुटुंबामध्ये ४ ते ८ सदस्य जाते, पाटा, वरवंटा घडविणारे. २३.0 टक्के कुटुंबामध्ये १ ते ३ सदस्य व २.0 टक्के कुटुंबामध्ये ४ ते ५ सदस्य गवंडी काम करणारे आढळून आले. २१.0 टक्के कुटुंबामध्ये १ ते ३ सदस्य मजूरी काम, ७.0 टक्के कुटुंबामध्ये १ ते २ सदस्य ठेकेदार आढळून आले. १४.0 टक्के कुटुंबामध्ये १ ते २ सदस्य कारखान्यातील कामगार, ६.0 टक्के कुटुंबामध्ये १ ते २ सदस्य खाजगी नोकरीमध्ये, ६.0 टक्के कुटुंबामध्ये १ ते २ सदस्य किराणा माल दुकान असल्याचे आढळून आले. ११.0 टक्के कुटुंबामध्ये १ ते २ सदस्य शासकीय नोकरी, १.0 टक्के कुटुंबामध्ये २ व्यक्ती उद्योगधंदा या व्यवसायामध्ये गुंतलेल्या दिसून येतात. २७.0 टक्के कुटुंबामध्ये १ ते २ (स्त्री) सदस्य धुणी-भांडी करत असल्याचे आढळून येतात. ५३.0 टक्के कुटुंबामध्ये १ ते ३ स्त्री सदस्य गृहिणी असल्याचे दिसून येते. तर २५.0 टक्के कुटुंबामध्ये इतर व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींची संख्या १ ते २ असल्याचे दिसून येते.

वरील सारणीवरून असा निष्कर्ष काढता येईल की, वडारवाडीतील व्यक्ती वेगवेगळ्या व्यवसायात गुंतल्या असल्या तरी त्या आपल्या पारंपरिक (जातीशी) संबंधित व्यवसाय करण्यात गुंतलेले आहेत. या समाजामधील लोक आजही स्वत:चा व्यवसाय व बांधकाम क्षेत्राशी संबंधित असणाऱ्या व्यवसायामध्ये आपले वर्चस्व कायमस्वरूपी टिकवून आहेत. काही सदस्यांनी सामाजिक वातावरणाशी तडजोड करून नविन व्यवसाय स्विकारल्याचे दिसून येते, परंतु त्यांचे प्रमाण फार कमी आहे. तसेच वडार समाजातील स्त्रियादेखील पुरूषाच्या बरोबरीने स्वत:ला कामामध्ये गुंतवून घेतात. परंतु ज्या स्त्रिया ठेकेदार आणि मोठे बांधकाम व्यावसायिक यांच्या घरामधील स्त्रिया गृहिणी असल्याचे दिसून येतात.

## ४. १२ वार्षिक उत्पन्न :

कुटुंबाच्या सरासरी वार्षिक उत्पन्नावरून त्या कुटुंबाचा आर्थिक स्तर किंवा आर्थिक परिस्थिती कशी आहे ते समजते, हे जाणून घेण्यासाठी उत्तरदात्यांना त्यांचे सरासरी वार्षिक उत्पन्न विचारून त्यानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक. ४.१२ मध्ये दर्शविण्यात आले आहे.

**सारणी क्रमांक. ४.१२**

**वार्षिक उत्पन्नानुसार केलेले वर्गीकरण**

| वार्षिक उत्पन्न | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| रू.१५,000 ते ३0,000 | ८ | ८.0 |
| रू.३0,000 ते ६0,000 | ३३ | ३३.0 |
| रू.६0,000 ते ९0,000 | ३५ | ३५.0 |
| रू.९0,00१ ते त्यापेक्षा अधिक | २४ | २४.0 |
| **एकूण** | **१00** | **१00.0** |

सारणी क्रमांक.४.१२ मधील दिलेल्या आकडेवारीवरून असे दिसून येते की, सर्वाधिक (३५.0%) उत्तरदात्यांचे वार्षिक उत्पन्न रू.६0,00१ ते ९0,000 पर्यंत असल्याचे दिसून येते. त्याखालोखाल (३३.0%) उत्तरदात्यांचे वार्षिक उत्पन्न रू.३0,00१ ते ६0,000 पर्यंत, तर उर्वरित अनुक्रमे (२४.0%) उत्तरदात्यांचे उत्पन्न रू. ९0,00१ ते त्यापेक्षा अधिक असल्याचे दिसून येते. (८.0%) उत्तरदात्यांचे वार्षिक उत्पन्न रू. १५,000 ते ३0,000 पर्यंत असल्याचे निदर्शनास येते.

वरील सारणीवरून असे दिसून येते की, अल्प उत्पन्न आणि वाढत्या महागाईमुळे होणारा खर्च यांचा मेळ बसविता येणे कठीण असल्याचे वडार समाजामधील लोकांच्यापुढे प्रश्न असल्याचा दिसून येतो.

## ४.१३ कुटुंबाचा प्रकार (Family Tyeps)

उत्तरदात्यांच्या कुटुंबाच्या प्रकारानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक. ४.१३ मध्ये दर्शविले आहे.

**सारणी क्रमांक. ४.१३**

**उत्तरदात्यांच्या कुटुंबाच्या प्रकारानुसार केलेले वर्गीकरण**

| कुटुंबाचा प्रकार | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| संयुक्त कुटुंब | ६0 | ६0.0 |
| विभक्त कुटुंब | ४0 | ४0.0 |
| **एकूण** | **१00** | **१00.0** |

सारणी क्रमांक.४.१३ मध्ये दिलेल्या आकडेवारीवरून असे दिसून येते की, बहुसंख्य (६0.0%) कुटुंबे संयुक्त कुटुंब असल्याची आढळून येतात. तर उर्वरित (४0.0%) विभक्त कुटुंब असल्याचे दिसून येतात.

वरील सारणीवरून असे अनुमान काढता येईल की, आजच्या काळामध्ये देखील नागरी औद्योगिक समाजामध्ये राहणाऱ्या वडार समाजात संयुक्त कुटुंबाचे प्रमाण बहुसंख्य (६0.0%) असल्याचे दिसून येते. याचाच अर्थ वडार समाजातील लोक हे संयुक्त कुटुंबामध्ये राहणे अधिक पसंत करतात किंवा संयुक्त कुटुंबामध्ये त्यांना सुरक्षिततेची भावना अधिक वाटते.

४.१४ भाषा : (Language)

उत्तरदात्यांचे भाषेनुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक.४.१४ मध्ये दर्शविले आहे.

**सारणी क्रमांक. ४.१४**

**उत्तरदात्यांच्या भाषेनुसार केलेले वर्गीकरण**

| भाषा | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| तेलगू + मराठी | ५५ | ५५.0 |
| तेलगू + मराठी + कन्नड | २७ | २७.0 |
| मराठी | १८ | १८.0 |
| **एकूण** | **१00** | **१00.0** |

सारणी क्रमांक.४.१४ मध्ये संकलित केलेल्या माहितीवरून बहुसंख्य (५५.0%) उत्तरदाते तेलगू व मराठी भाषा बोलत असल्याचे दिसून येतात. त्याखालोखाल (२७.0%) उत्तरदाते तेलगू, मराठी व कन्नड या तिन्ही भाषा बोलत असल्याचे दिसून येते. तर उर्वरित (१८.0%) उत्तरदाते केवळ मराठी भाषा बोलत असल्याचे दिसून येते.

वरील सारणीवरून आपणाला असे म्हणता येईल की, वडारांची मूळ भाषा तेलगू (वडारी) सर्व उत्तरदात्यांना अवगत असली तरी शहराच्या संपर्कामुळे वडार समाजातील लोकांनी इतरही भाषा मोठ्या प्रमाणावर आत्मसात केल्याचे दिसून येते.

**४.१५ केव्हापासून वडारवाडीत राहता यानुसार केलेले वर्गीकरण**

वडार समाज हा भटक्या अवस्थेत जीवन जगत असल्याने त्यांच्या स्थिरतेची कल्पना येण्यासाठी वडारवाडीत कधीपासून वास्तव्य करून आहेत. याविषयी माहिती संकलित केली होती. त्यानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक ४.१५ मध्ये सादर केले आहे.

### सारणी क्रमांक ४.१५

### वडारवाडीतील लोकांचे वास्तव्य यानुसार केलेले वर्गीकरण

| वडारवाडीतील लोकांचे वास्तव्य | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| १ ते १५ वर्षे | ११ | ११.0 |
| १६ ते ३0 वर्षे | १0 | १0.0 |
| ३१ ते ४५ वर्षे | ५७ | ५७.0 |
| ४६ ते ६0 वर्षे | १७ | १७.0 |
| ६१ पेक्षा अधिक | ५ | ५.0 |
| **एकूण** | **१00** | **१00.0** |

सारणी क्रमांक.४.१५ मध्ये दिलेल्या माहितीवरून असे दिसून येते की, बहुतांशी (५७.0%) उत्तरदाते ३१ ते ४५ वर्षे वडारवाडीत राहत असल्याचे दिसून येतात. त्याखालोखाल (१७.0%) उत्तरदाते ४६ ते ५0 वर्षे, उर्वरित अनुक्रमे (११.0%) उत्तरदाते १ ते १५ वर्षे, (१0.0%) उत्तरदाते १६ ते ३0 वर्षे, (५.0%) उत्तरदाते ६१ पेक्षा अधिक वर्षे वडारवाडीत वास्तव्य करून असल्याचे दिसून आले.

वरील सारणीवरून आपणाला असे अनुमान काढता येईल की, या भटक्या समाजाला काही अंशी स्थिरता लाभली असलो तरी कामाच्या निमित्ताने वडार समाजाला गावो-गाव भटकावे लागते. जिथे हाताला काम आणि पोटाला अन्न मिळेल तिथेच पाल ठोकून प्रपंच थाटायचा, काम संपले की पालासकट प्रपंच वाहून दुसऱ्या गावी न्यायच असा जीवनाचा भटका क्रम नियमित ठरलेला असायचा असा समाज गेल्या तीस-चाळीस वर्षात एकूणच वडार जमातीमध्ये थोडाफार बदल झालेला आहे. थोड्याफार प्रमाणात वडार समाज शहरात स्थिरावलेला दिसून येतो.

## ४.१६ राहते घर :

उत्तरदात्यांच्या निवासस्थानानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक. ४.१६ मध्ये दर्शविले आहे.

**सारणी क्रमांक. ४.१६**

**उत्तरदात्यांच्या निवासस्थानानुसार केलेले वर्गीकरण**

| राहते घर | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| स्वत:चे घर | ८६ | ८६.0 |
| भाडोत्री घर | १४ | १४.0 |
| **एकूण** | **१00** | **१00.0** |

सारणी क्रमांक.४.१६ मध्ये सादर केलेल्या माहितीवरून असे दिसून येते की, बहुसंख्य (८६.0%) उत्तरदात्यांचे स्वत:चे घर असल्याचे दिसून येते. उर्वरित (१४.0%) उत्तरदाते भाडोत्री घरामध्ये राहत असल्याचे दिसून येतात.

## ४.१७ घराचा प्रकार (Current residence):

उत्तरदात्यांच्या घराच्या प्रकारानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक ४.१७ मध्ये दर्शविले आहे.

**सारणी क्रमांक. ४.१७**

**उत्तरदात्यांच्या घराच्या प्रकारानुसार केलेले वर्गीकरण**

| घराचा प्रकार | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| कच्चे घर | ३५ | ३५.0 |
| झोपडी | ८ | ८.0 |
| पक्के घर | ३७ | ३७.0 |
| आर.सी.सी. बांधकाम | २0 | २0.0 |
| **एकूण** | **१00** | **१00.0** |



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

सारणी क्रमांक. ४.१७ मध्ये दिलेल्या माहितीवरून असे दिसून येते की, सर्वाधिक (३७.0%) उत्तरदात्यांचे पक्के घर असल्याचे दिसून येते. त्याखालोखाल (३५.0%) उत्तरदात्यांचे कच्चे घर, उर्वरित (२0.0%) उत्तरदात्यांचे आर.सी.सी. बांधकाम, अत्यल्प (८.0%) उत्तरदात्यांचे झोपडी असल्याचे दिसून येते.

वरील सारणीवरून असा निष्कर्ष काढता येईल की, बहुतांशी (७२.0%) उत्तरदात्यांची घरे वा घराचे स्वरूप हे कौलारू, माती, दगड किंवा विटाचे या स्वरूपाचे असल्याचे आढळले. उर्वरित (२0.0%) उत्तरदात्यांचे आर.सी.सी. बांधकाम असल्याचे दिसून आले. (८.0%) उत्तरदाते अस्थाई झोपड्या या स्वरूपाच्या निवाऱ्यात वास्तव्य करताना दिसतात.

## ४.१८ खोल्यांची संख्या :

प्रस्तुत नमुन्यांमध्ये निवडलेल्या उत्तरदात्यांना घरामध्ये किती खोल्या आहेत? असा प्रश्न विचारला होता? याविषयी संकलित केलेल्या माहितीनुसार वर्गीकरण सारणी क्रमांक ४.१८ मध्ये दर्शविले आहे.

**सारणी क्रमांक. ४.१८**

**उत्तरदात्यांच्या खोल्यांच्या संख्येनुसार केलेले वर्गीकरण**

| घराचा प्रकार | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| एक खोली | २७ | २७.0 |
| दोन खोल्या | २९ | २९.0 |
| तीन खोल्या | १९ | १९.0 |
| चार खोल्या | १५ | १५.0 |
| पाच खोल्या व त्याहून अधिक | १0 | १0.0 |
| **एकूण** | **१00** | **१00.0** |

सारणी क्रमांक. ४.१८ मध्ये संकलित केलेल्या माहितीवरून असे दिसून येते की, सर्वाधिक (२९.0%) उत्तरदाते २ खोल्यामध्ये आपले वास्तव्य करत असल्याचे दिसून येते. त्याखालोखाल (२७.0%) उत्तरदाते एक खोलीमध्ये, उर्वरित अनुक्रमे (१९.0%) उत्तरदाते ३ खोल्यांमध्ये राहत असल्याचे दिसून येतात. तर (१५.0%) उत्तरदाते चार खोल्यांमध्ये (१0.0%) उत्तरदाते पाच खोल्या व त्याहून अधिक खोल्यांमध्ये राहत असल्याचे दिसून येते.

वरील सारणीवरून आपणाला असे म्हणता येईल की, बहुतांशी (५६.0%) उत्तरदाते एक खोली किंवा दोन खोल्यांमध्ये राहत असल्याचे दिसून येते.

## ४.१९ घरभाड्यावरील खर्च :

मानवाच्या अन्न, वस्त्र, निवारा या तीन मूलभूत गरजापैकी घर/ निवारा ही तिसरी आवश्यक गरज आहे. त्यानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक ४.१९ मध्ये दर्शविले आहे.

**सारणी क्रमांक. ४.१९**

**उत्तरदात्यांच्या घरभाड्यावरील खर्च यानुसार वर्गीकरण**

| घरभाड्यावरील खर्च रू | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| घरभाडे नाही (स्वत:चे घर) | ८६ | ८६.0 |
| रू. २00 ते ५00 | ७ | ७.0 |
| रू. ५0१ ते १000 | ५ | ५.0 |
| रू. १00१ ते त्याहून अधिक | २ | २.0 |
| **एकूण** | **१00** | **१00.0** |

सारणी क्रमांक.४.१९ मध्ये दिलेल्या आकडेवारीवरून उत्तरदात्यांच्या घरभाड्यावरील खर्चाची कल्पना येते. १00 पैकी (८६.0%) उत्तरदाते स्वत:च्या घरात राहत

असल्याने घरभाड्यापोटी त्यांना काही खर्च करावा लागत नाही. उर्वरित भाडोत्री घरामध्ये राहतात. त्यापैकी रू. २०० ते ५०० पर्यंत भाडे भरावे लागणारे (७.0%), त्याखालोखाल रू. ५0१ ते १000 पर्यंत रक्कम खर्च करावी लागणारे (५.0%) असून, उर्वरित रू. १00१ ते त्याहून अधिक खर्च करावे लागणारे (२.0%) असल्याचे दिसून येते.

## ४.२० पिण्याचे पाणी :

पिण्याचे पाणी कोठून उपलब्ध होते याविषयी माहिती मिळविली होती. नमुन्यामध्ये निवडलेल्या १00 उत्तरदात्यांचे पिण्याचे पाणी उपलब्ध होण्याचे स्त्रोतानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक ४.२० मध्ये सादर केले आहे.

**सारणी क्रमांक ४.२०**

**पिण्याचे पाणी उपलब्ध होण्याच्या स्त्रोतानुसार केलेले वर्गीकरण**

| पिण्याचे पाणी | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| सार्वजनिक नळ | २४ | २४.0 |
| व्यक्तिगत नळ कनेक्शन | ७६ | ७६.0 |
| **एकूण** | **१00** | **१00.0** |

सारणी क्रमांक. ४.२० मधील माहितीवरून असे दिसून येते की, एकूण १00 उत्तरदात्यांमध्ये व्यक्तिगत नळ कनेक्शन धारक उत्तरदात्यांचे प्रमाण (७६.0%) हे सार्वजनिक नळ कनेक्शन धारक उत्तरदात्यांपेक्षा (२४.0%) अधिक होते, असे दिसून येते.

## ४.२१ घरातील मूलभूत सोयी :

नमुन्यामध्ये निवडलेल्या उत्तरदात्यांना घरामध्ये वीज, स्नानगृह व शौचालय या सोयी आहेत का? असा प्रश्न विचारला होता. उत्तरदात्यांनी उत्तरादाखल दिलेल्या माहितीवरून केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक ४.२१ मध्ये सादर केले आहे.

सारणी क्र. ४.२१

उत्तरदात्यांच्या घरातील मूलभूत सोयीनुसार केलेले वर्गीकरण

| मूलभूत सोयी | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| वीज | ९ | ९.0 |
| वीज + स्नानगृह | ५८ | ५८.0 |
| वीज + स्नानगृह + शौचालय | ३३ | ३३.0 |
| **एकूण** | **१00** | **१00.0** |

सारणी क्रमांक ४.२१ मध्ये संकलित केलेल्या माहितीवरून असे दिसून येते की, बहुतांशी (५८.0%) उत्तरदात्यांच्या घरामध्ये वीज व स्नानगृह या सोयी असल्याचे आढळून येते. त्याखालोखाल (३३.0%) उत्तरदात्यांच्या घरामध्ये वीज, स्नानगृह व शौचालय या प्राथमिक सोयी असल्याचे निदर्शनास आले. उर्वरित (९.0%) उत्तरदात्यांच्या घरामध्ये केवळ वीजेची सोय असल्याचे दिसून येते.

वरील सारणीवरून असे आपणाला म्हणता येईल की, बहुसंख्य (५८.0%) उत्तरदात्यांच्या घरामध्ये वीज व स्नानगृह असल्याचे आढळून आले. परंतु काही घरांमध्ये स्नानगृह हे घराच्या पाठीमागे दगड ठेवून आडोसा तयार करून बनविलेले आढळते. ज्या उत्तरदात्यांची परिस्थिती चांगली आहे, अशा (३३.0%) उत्तरदात्यांच्या घरामध्ये वीज, स्नानगृह व शौचालय या प्राथमिक सोयी असल्याचे दिसून येते.

## ४.२२ आरोग्याची प्राथमिक काळजी :

नमुन्यांमध्ये निवडलेल्या उत्तरदात्यांना तुम्ही आरोग्याची प्राथमिक काळजी घेता का? असा प्रश्न विचारला होता. उत्तरदात्यांनी उत्तरादाखल दिलेल्या माहितीवरून असे स्पष्ट होते की, नमुन्यांमध्ये निवडलेले १00 टक्के उत्तरदाते आरोग्याची प्राथमिक काळजी घेत असल्याचे दिसून येते.

## ४.२३ त्यासाठी काय करता?

नमुन्यामध्ये निवडलेल्या उत्तरदात्यांना तुम्ही आरोग्याची प्राथमिक काळजी घेण्यासाठी काय करता? असा प्रश्न विचारला होता. उत्तरदात्यांनी उत्तरादाखल दिलेल्या माहितीवरून असे स्पष्ट होते की, बहुतांशी (९६.0%) उत्तरदाते प्राथमिक काळजी घेण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रात जाणे पसंत करतात. तर उर्वरित ४.0% उत्तरदाते देवऋषींचा आधार घेत असल्याचे दिसून येते.

## ४.२४ मुलांना शाळेत पाठवणे :

नमुन्यामध्ये निवडलेल्या उत्तरदात्यांना तुम्ही तुमच्या मुलांना शाळेत पाठवता का? असा प्रश्न विचारला होता. उत्तरदात्यांनी उत्तरादाखल दिलेल्या माहितीवरून स्पष्ट होते की, नमुन्यामध्ये निवडलेले १00 टक्के उत्तरदाते आपल्या मुलांना शाळेत पाठवत असल्याचे दिसून येते.

## ४.२५ व्यवसाय स्विकारण्याचे कारण :

नमुन्यामध्ये निवडलेल्या उत्तरदात्यांचा व्यवसाय स्विकारण्यामागील कारण जाणून घेण्यासाठी माहिती संकलित केली होती. त्यानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक.४.२५ मध्ये दर्शविले आहे.

**सारणी क्रमांक. ४.२५**

**व्यवसाय स्विकारण्यामागील कारणानुसार केलेले वर्गीकरण**

| व्यवसाय स्विकारण्यामागील कारण | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| आर्थिक कारण | ३६ | ३६.0 |
| पारंपरिक | ५0 | ५0.0 |
| आर्थिक कारण+अशिक्षितपणा | १४ | १४.0 |
| **एकूण** | **१00** | **१00.0** |

सारणी क्रमांक ४.२५ मध्ये सादर .केलेल्या आकडेवारीवरून निम्मे (५0.0%) उत्तरदाते व्यवसाय स्विकारण्यामागील कारण पारंपरिक असल्याचे सांगतात असे दिसून येते. त्याखालोखाल (३६.0%) उत्तरदाते आर्थिक कारणासाठी हा व्यवसाय स्विकारलेला आहे. आहे. आर्थिक कारण व अशिक्षितपणा (१४.0%) व्यवसाय स्विकारणारे उत्तरदात्यांचे प्रमाण नगण्य असल्याचे दिसून येते.

वरील सारणीवरून आपणाला असे म्हणता येईल की, निम्मा उत्तरदात्यांनी पारंपरिकतेनुसार व्यवसाय स्विकारलेला दिसून येतो.

## ४.२६ कर्ज :

उत्तरदात्यांना कर्ज काढण्याची आवश्यकता वाटते का? याविषयी माहिती संकलित केलेली होती. त्यानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक ४.२६ मध्ये दर्शविले आहे.

**सारणी क्रमांक. ४.२६**

**उत्तरदात्यांचे कर्ज काढण्याच्या आवश्यकतेनुसार केलेले वर्गीकरण**

| कर्जबाबतचा विचार | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ७0 | ७0.0 |
| नाही | ३0 | ३0.0 |
| **एकूण** | **१00** | **१00.0** |

सारणी क्रमांक.४.२६ मध्ये दिलेल्या आकडेवारीवरून असे दिसून येते की, बहुसंख्य (७0.0%) उत्तरदात्यांनी कर्ज घेतल्याचे दिसून येते. उर्वरित (३0.0%) उत्तरदात्यांनी कर्ज घेतलेले नसल्याचे दिसून येते.

वरील सारणीवरून आपणाला असे म्हणता येईल की, बहुसंख्य (७0.0%) उत्तरदाते खर्च भागविण्यासाठी कर्ज घेतात, असे दिसून येते. कारण वाढत्या भाववाढीच्या काळात वडार जमातींच्या लोकांना मिळणारी मजूरी अल्प, त्यात बारामहिने कामाची शाश्वती

नाही. मिळणाऱ्या पगारात कुटुंबाचा उदरनिर्वाह भागविणे अशक्य अशावेळी कामगारांपुढे कर्जा शिवाय अन्य मार्ग नसतो.

### ४.२७ कर्जाची रक्कम :

कर्जाच्या रक्कमेनुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक ४.२७ मध्ये दर्शविले आहे.

**सारणी क्र. ४.२७**

**उत्तरदात्यांचे कर्जाच्या रक्कमेनुसार केलेले वर्गीकरण**

| कर्जाची रक्कम | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| रू.१000 ते १५,000/- | २२ | २२.0 |
| रू.१५,00१ ते ३0,000/- | २४ | २४.0 |
| रू.३0,00१ ते ६0,000/- | ८ | ८.0 |
| रू. ६0,00१ ते त्यापेक्षा जास्त | १६ | १६.0 |
| लागू होत नाही | ३0 | ३0.0 |
| **एकूण** | **१00** | **१00.0** |

सारणी क्र. ४.२७ मध्ये सादर केलेल्या आकडेवारीवरून (२४.0%) उत्तरदात्यांनी रू. १५,00१ ते ३0,000 पर्यंत कर्ज घेतलेले असल्याचे दिसून येते. त्याखालोखाल (२२.0%) उत्तरदात्यांनी रू. १000 ते १५,000 पर्यंत कर्ज काढलेले असल्याचे निदर्शनास येते. उर्वरित अनुक्रमे (१६.0%) उत्तरदात्यांनी रू.६0,00१ ते त्यापेक्षा अधिक कर्ज घेतल्याचे दिसून येते. (८.0%) उत्तरदात्यांनी रू.३0,00१ ते ६0,000 पर्यंत कर्ज काढल्याचे दिसून येते. तर (३0.0%) उत्तरदात्यांनी कोणत्याही स्वरूपाचे कर्ज काढलेले नाही.

वरील सारणीवरून आपणाला असे म्हणता येईल की, उत्पन्न व खर्च यांचा मेळ घालता येत नसल्यामुळे कर्ज हे घ्यावे लागते, परंतु कर्जाची रक्कम अल्प प्रमाणात असल्याचे दिसून येते.

## ४.२८ कर्जाचे मार्ग :

कर्ज घेण्याच्या मार्गावरून केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक ४.२८ मध्ये दर्शविले आहे.

**सारणी क्रमांक. ४.२८**

**उत्तरदात्यांचे कर्जाचे मार्ग यानुसार केलेले वर्गीकरण**

| कर्जाचे मार्ग | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| सावकार | २३ | २३.0 |
| बँक | ३५ | ३५.0 |
| बचतगट | ६ | ६.0 |
| पतसंस्था | ६ | ६.0 |
| लागू होत नाही | ३0 | ३0.0 |
| **एकूण** | **१00** | **१00.0** |

सारणी क्रमांक.४.२८ मध्ये दिलेल्या माहितीवरून असे दिसून येते की, सर्वाधिक (३५.0%) उत्तरदात्यांनी बँकेमधून कर्ज घेतलेले असल्याचे निदर्शनास येते. त्याखालोखाल (२३.0%) उत्तरदात्यांनी सावकाराकडून कर्ज घेतले असल्याचे आढळून येते. उर्वरित अनुक्रने (६.0%) उत्तरदात्यांनी बचतगट व पतसंस्थेकडून कर्ज घेतलेले असल्याचे दिसून येते. तर उर्व रित (३0.0%) उत्तरदात्यांनी कोणत्याही स्वरूपाचे कर्ज काढलेले नाही.

वरील सारणीवरून आपणाला असे म्हणता येईल की, बहुतांशी (३५.0%) उत्तरदाते बँकेमधून कर्ज घेत असल्याचे दिसून येतात.

## ४.२९ कर्जाची कारणे :

प्रस्तुत नमुन्यामध्ये निवडलेल्या उत्तरदात्यांना तुम्ही कर्ज कोणत्या कारणांसाठी घेता हे जाणून घेण्यासाठी माहिती संकलित केली होती. त्यानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक ४.२९ मध्ये दर्शविले आहे.

## सारणी क्रमांक. ४.२९

## उत्तरदात्यांची कर्जाची कारणे यानुसार केलेले वर्गीकरण

| कर्ज घेण्यामागील कारण | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| व्यवसायासाठी | २३ | २३.0 |
| विवाह | १0 | १0.0 |
| शिक्षणासाठी | ३ | ३.0 |
| आजारपण | ४ | ४.0 |
| धार्मिक सण समारंभ + घर खर्चासाठी | २५ | २५.0 |
| घर बांधण्यासाठी | ५ | ५.0 |
| लागू होत नाही | ३0 | ३0.0 |
| **एकूण** | **१00** | **१00.0** |

सारणी क्रमांक. ४.२९ मध्ये दिलेल्या आकडेवारीवरून असे दिसून येते की, बहुसंख्य (३0.0%) उत्तरदात्यांना लागू होत नाही. उर्वरित उत्तरदात्यांपैकी सर्वाधिक (२५.0%) उत्तरदात्यांनी धार्मिक सण समारंभ व घरखर्चासाठी कर्ज घेतल्याचे निदर्शनास येते. त्याखालोखाल (२३.0) टक्के उत्तरदात्यांनी व्यवसायासाठी कर्ज घेतलेले असल्याचे दिसून येते. उर्वरित अनुक्रमे (१0.0%) उत्तरदात्यांनी विवाहासाठी, (५.0%) उत्तरदात्यांनी घरबांधण्यासाठी, (४.0%) उत्तरदात्यांनी आजारपणासाठी, (३.0%) उत्तरदात्यांनी शिक्षणासाठी कर्ज घेतलेले असल्याचे दिसून येते. तर (३0.0%) उत्तरदात्यांना कोणत्याही स्वरूपाचे कर्ज काढावे लागत नसल्याचे दिसून येते.

वरील सारणीवरून आपणाला असे अनुमान काढता येईल की, नमुन्यामध्ये निवडलेल्या ७0 उत्तरदात्यांना कर्ज काढण्याची आवश्यकता भासते. कर्ज काढण्याचे कारण वेगवेगळ्या उत्तरदात्यांचे वेगवेगळे असले तरी बहुतांशी (२५.0%) उत्तरदाते धार्मिक सण समारंभ व घरखर्चासाठी कर्ज घेत असल्याचे दिसून येते. त्यामुळे आपणाला असे म्हणता येईल की, वडार जमातीमध्ये अजूनही रूढी-परंपरेचे पालन मोठ्या प्रमाणावर केले जाते. तसेच

शिक्षण आधुनिकीकरणाचा, प्रसारमाध्यमांचा प्रसार होऊन देखील अंधश्रद्धेचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर दिसून येते. त्यामुळे कमी उत्पन्न असून देखील धार्मिक सण-समारंभासाठी कर्ज काढले जाते असे दिसून येते.

## ४.३० बचत :

नमुन्यांमध्ये निवडलेल्या उत्तरदात्यांना तुम्ही पैसे कोठे बचत करता का ? याविषयी प्रश्न विचारले होते त्यानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक. ४.३० मध्ये दर्शविले आहे.

**सारणी क्रमांक. ४.३०**

**उत्तरदात्यांच्या बचतनुसार केलेले वर्गीकरण**

| बचतीबाबतचा दृष्टीकोन | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| बचत करणारे | ५५ | ५५.0 |
| बचत न करणारे | ४५ | ४५.0 |
| एकूण | १00 | १00.0 |

सारणी क्रमांक. ४.३० दिलेल्या आकडेवारीवरून असे दिसून येते की, बहुसंख्य (५५.0%) उत्तरदाते बचत करत असल्याचे दिसून येतात. उर्वरित (४५.0%) उत्तरदाते कुठेही बचत करत नसल्याचे दिसून येते.

वरील सारणीवरून आपल्याला असा निष्कर्ष काढता येईल की, बहुसंख्य (५५.0%) उत्तरदात्यांनी होकारार्थी उत्तर दिले. अल्प का होईना पण बचत करण्याचा प्रयत्न करतात. बचत करणारे काही उत्तरदाते मोठ्या प्रमाणावर बचत करतात असे नाही. परंतु भविष्य काळात येणाऱ्या अडचर्णीना खारीच्या वाट्याने का होईना तोंड देता यावे अशा हेतूने पाऊल उचलले गेले आहे असे दिसून येते. आपल्या मजूरी किंवा पगारामधील होणाऱ्या खर्चामधील काटछाट करून बचतीसाठी काही रक्कम शिल्लक ठेवत असल्याचे दिसून येते.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

## ४.३१ बचतीचे मार्ग :

बचतीच्या मार्गाविषयी माहिती संकलित केली होती, त्यानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक ४.३१ मध्ये दर्शविले आहे.

**सारणी क्रमांक ४.३१**

**उत्तरदात्यांच्या बचतीचे मार्ग यानुसार केलेले वर्गीकरण**

| बचतीचा मार्ग | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| बँक | १६ | १६.0 |
| बचतगट | १५ | १५.0 |
| बँक स्वत:च्या घरामध्ये भिशी | १0 | १0.0 |
| भिशी | १४ | १४.0 |
| लागू होत नाही | ४५ | ४५.0 |
| एकूण | १00 | १00.0 |

सारणी क्र. ४.३१ मध्ये दिलेल्या आकडेवारीवरून असे दिसून येते की, ४५.0% उत्तरदात्यांना हा प्रश्न लागू होत नाही. उर्वरित उत्तरदात्यापैकी सर्वाधिक (१६.0%) उत्तरदात्यांनी बँकेमध्ये बचत करतात. त्याखालोखाल (१५.0%) उत्तरदात्यांनी बचतगट, उर्व रित अनुक्रमे (१४.0%) उत्तरदाते भिशीचा मार्ग अवलंबतात, (१0.0%) उत्तरदात्यांनी बँक, स्वत:च्या घरामध्ये व भिशी अशा ठिकाणी बचत केल्याचे दिसून येते.

वरील सारणीवरून आपणाला असे म्हणता येईल की, बचत करण्याचे मार्ग वेगवेगळ्या उत्तरदात्यांचे वेगवेगळे असले तरी थोड्या प्रमाणात का होईना बचत करत असल्याचे दिसून येते.

## ४.३२ शेतजमीन :

प्रस्तुत नमुन्यामध्ये निवडलेल्या उत्तरदात्यांना तुमच्या मालकीची शेती आहे का ? असा प्रश्न विचारला होता. उत्तरदात्यांनी उत्तरादाखल दिलेल्या माहितीवरून असे स्पष्ट होते

की, नमुन्यांमध्ये निवडलेल्या १00 टक्के उत्तरदात्यांपैकी २.0 टक्के उत्तरदात्यांच्याकडे स्वत:च्या मालकीची शेती असल्याचे निदर्शनास आले. तर बहुतांशी (९८.0%) उत्तरदात्यांच्याकडे स्वत:च्या मालकीची शेती नसल्याचे दिसून येते.

## ४.३३. एकूण जमीन :

प्रस्तुत नमुन्यामध्ये निवडलेल्या उत्तरदात्यांच्यामध्ये २१ ते त्याहून अधिक एकर असणाऱ्या उत्तरदाता १ आणि ६ ते १0 एकर शेती असणारा उत्तरदाता एक असल्याचे निदर्शनास येते.

## ४.३४ शेतापासून उत्पन्न :

नमुन्यामध्ये निवडलेल्या उत्तरदात्यांना शेतीमधून मिळणारे उत्पन्न किती आहे? असा प्रश्न विचारला होता. उत्तरदात्यांनी उत्तरादाखल दिलेल्या माहितीवरून असे स्पष्ट होते की, एका उत्तरदात्याला शेतीतून मिळणारे उत्पन्न रू.९0,00१ ते त्यापेक्षा अधिक असल्याचे दिसून येते. तर दुसऱ्या उत्तरदात्याला शेतीतून मिळणारे उत्पन्न रू. ६0,00१ ते ९0,000 पर्यंत असल्याचे दिसून येते.

## ४.३५ स्थलांतर :

वडार समाजातील स्थलांतराचे प्रमाण वा स्थिरत्व पाहण्याच्या उद्देशाने उत्तरदात्यांच्या स्थलांतराचे केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक ४.३५ मध्ये दर्शविण्यात आले आहे.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

## सारणी क्रमांक. ४.३५

### उत्तरदात्यांचे स्थलांतर यानुसार केलेले वर्गीकरण

| स्थलांतर करता का? | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ४५ | ४५.0 |
| नाही | ५५ | ५५.0 |
| एकूण | १00 | १00.0 |

सारणी क्रमांक.४.३५ मधील दिलेल्या माहितीवरून असे दिसून येते की, बहुतांशी (५५.0%) उत्तरदाते स्थलांतर करीत नसल्याचे दिसून येते. तर उर्वरित (४५.0%) उत्तरदाते स्थलांतर करतात. स्थलांतर करणाऱ्या उत्तरदात्यांना कामानिमित्त किंवा व्यवसायाच्या निमित्ताने काहीवेळा एकट्या पुरूष मंडळीला, तर काहीवेळा संपूर्ण कुटुंबाला व्यवसायाच्या निमित्ताने स्थलांतर करावे लागत असल्याचे दिसून येते.